मा. उपमुख्यमंत्री (वित्त) श्री. अजित पवार यांनी शुक्रवार, दिनांक ११ मार्च २०२२ रोजी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणाची ठळक वैशिष्ट्ये.

भाग–एक

- विकासाची पंचसूत्री-कृषी, आरोग्य, मनुष्यबळ विकास, दळणवळण आणि उद्योग या क्षेत्रांसाठी १ लाख १५ हजार २१५ कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित. येत्या तीन वर्षांत ४ लाख कोटी रुपये उपलब्ध करुन देणार. कृषी व संलग्न क्षेत्रांसाठी २३ हजार ८८८ कोटी तरतुद. आरोग्य क्षेत्रासाठी ५ हजार २४४ कोटी रुपये तरतुद. मानव विकास व मनुष्यबळ विकासासाठी ४६ हजार ६६७ कोटी तरतुद. पायाभूत सुविधा व वाहतूकीसाठी २८ हजार ६०५ कोटी तरतुद. उद्योग व उर्जा विभागासाठी १० हजार १११ कोटीची तरतुद.

पंचसूत्रीमधील पहिले सूत्र : कृषी व संलग्न

- **नियमित कर्जफेड करणाऱ्या २० लाख शेतकऱ्यांना** प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये अनुदान - १० हजार कोटी रुपयाचा खर्च अपेक्षित आहे.
- **भूविकास बँकेच्या** ३४ हजार ७८८ कर्जदार शेतकऱ्यांची ९६४ कोटी १५ लाख रुपयांची कर्जमाफी, बँकेच्या कर्मचाऱ्यांची २७५ कोटी ४० लाख रुपये एवढी देणी अदा करणार.
- **सोयाबीन व कापूस** पिकांसाठी विशेष कृती योजनेसाठी ३ वर्षात १ हजार कोटी रुपये निधी देण्यात येणार.
- मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेअंतर्गत **शेततळ्याचा** समावेश करुन अनुदानाच्या रकमेत ५० टक्के वाढ करुन ते ७५ हजार रुपये केले.
- **बाजार समित्यांनी** (३०६) पायाभूत सुविधांसाठी घेतलेल्या कर्जावरील **व्याजाची १०० टक्के परतफेड** करण्यासाठी सहाय. रु. १०,००० कोटी गुंतवणूक अपेक्षित.
- किमान आधारभूत किंमतीनुसार शेतमाल खरेदी करिता ६ हजार ९५२ कोटी रुपयांची तरतूद.
- कृषी निर्यात धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य.
- २० हजार ७६१ **प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांचे (PACS) संगणकीकरण** करण्याकरिता ९५० कोटी रुपयांची गुंतवणूक.

- मागील दोन वर्षात २८ **सिंचन प्रकल्पात** पाणीसाठा करण्यात आला असून येत्या दोन वर्षात १०४ प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन
- **गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पासाठी** सन २०२२-२३ मध्ये ८५३ कोटी ४५ लाख रुपये निधी
- मृद व जलसंधारणाची दोन वर्षात ४ हजार ८८५ कामे पूर्ण करण्याचे नियोजन, ४ हजार ७७४ कोटी रुपये खर्च प्रस्तावित
- सन २०२२-२३ मधे ६० हजार **कृषिपंपांना वीज जोडणीचे** उद्दीष्ट.
- **रोजगार हमी योजनेअंतर्गत** फळबाग लागवड योजनेमध्ये केळी, ड्रॅगन फ्रुट, एव्हॅकॅडो, द्राक्षे आदी फळ पिके तसेच अन्य महत्त्वाच्या मसाला पिकांचा नव्याने समावेश
- देशी गायी, म्हशींची उत्पादकता वाढवण्यासाठी विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी प्रत्येकी एक, अशा एकूण **तीन मोबाईल प्रयोगशाळा.**

पंचसूत्रीमधील दुसरे सूत्र : सार्वजनिक आरोग्य

- नांदेड, अमरावती, जालना, भंडारा, अहमदनगर आणि सातारा येथे प्रत्येकी ५० खाटांची प्रथम दर्जाची **ट्रॉमा केअर युनिट** उभारणार.
- २०० खाटांच्या सर्व रुग्णालयांमध्ये येत्या तीन वर्षात **लिथोट्रिप्सी उपचार पद्धती** सुरु करणार.
- मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी आधुनिक **'फेको'** उपचार पद्धती सुरु करणार.
- ५० खाटांच्या रुग्णालयांना **यांत्रिक धुलाई संयंत्रे** व ३० खाटांवरील रुग्णालयांना **स्वच्छता यंत्रे** देणार.
- **मोबाईल कर्करोग निदान वाहनांची** सुविधा देणार.
- हिंगोली, यवतमाळ, बुलढाणा, सांगली, सातारा, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, वर्धा, भंडारा, जळगाव, अहमदनगर, धुळे, सोलापूर, रत्नागिरी, औरंगाबाद आणि रायगड येथे प्रत्येकी **१०० खाटांची स्त्री रुग्णालये** स्थापन करणार.
- जालना येथे ३६५ खाटांचे नवीन प्रादेशिक **मनोरुग्णालय** स्थापन करण्याकरिता ६० कोटी रुपये उपलब्ध करणार.
- **मुंबई** येथे सेंट जॉर्ज पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था, **नाशिक** येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठात वैद्यकीय पदव्युत्तर संस्था, **नागपूर** येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था येथे **पदव्युत्तर संस्था** स्थापन करण्यात येणार.
- **अन्न सुरक्षा कार्यप्रणालीचे** बळकटीकरणासाठी २ वर्षात १०० कोटी उपलब्ध करणार
- पुणे शहराजवळ अत्याधुनिक **'इंद्रायणी मेडिसीटी'** उभारण्यात येणार.

- रोजगारक्षम मनुष्यबळ निर्माणासाठी ५०० कोटी रुपये खर्चून **'इनोव्हेशन हब'** स्थापन करण्यात येणार.
- **स्टार्ट अप फंडासाठी** १०० कोटी.

पंचसूत्रीमधील तिसरे सूत्र : मनुष्यबळ विकास

- १ लाख २० हजार अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिकांना **ई शक्ती** योजनेतून मोबाईल सेवा देणार.
- **बालसंगोपनाच्या अनुदानात** ११२५ रुपयांवरुन २५०० रूपयांपर्यंत वाढ.
- प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी **अमृत महोत्सवी महिला व बाल भवन** उभारणार.
- नागरी भागातील अतितीव्र कुपोषित बालकांसाठी **नागरी बाल विकास केंद्रे** सुरु करणार.
- शासकीय वसतिगृहातील विद्यार्थिनीसाठी **मोफत सॅनिटरी नॅपकीन डिस्पेन्सींग मशिन.**

पंचसूत्रीमधील चौथे सूत्र : दळणवळण

- मुख्यमंत्री ग्राम सडक योजना **टप्पा-२** अंतर्गत १०,००० कि.मी. लांबीच्या रस्त्याकरिता **७५००** कोटी रूपये तरतुद.
- ६५५० कि.मी. लांबीच्या पंतप्रधान ग्रामसडक योजना **टप्पा-३** चा प्रारंभ.
- हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र **समृद्धी महामार्गाचा नागपूर ते भंडारा-गोंदिया, नागपूर ते गडचिरोली** असा विस्तार करणार.
- १६०३९ कोटी रुपयांच्या **नाशिक-पुणे मध्यम अतिजलद** रेल्वे प्रकल्पाकरीता भूसंपादन सुरु.
- मुंबईतील मेट्रो मार्गिका क्रमांक ३, **कुलाबा-वांद्रे-सीप्झ** या मार्गिकेचा विस्तार कफ परेडपासून **नेव्हीनगरपर्यंत.**
- पुण्यातील स्वारगेट ते कात्रज व पिंपरी ते निगडी, वनाझ ते चांदणी चौक, रामवाडी ते वाघोली, स्वारगेट ते हडपसर, हडपसर ते खराडी, खडकवासला ते स्वारगेट **मेट्रो प्रकल्प** अहवाल तयार करण्याचे काम सुरु.
- महाराष्ट्र राज्य **परिवहन महामंडळाच्या** ३००० नवीन बसगाड्या व १०३ बसस्थानकांच्या आधुनिकीकरण यासाठी भांडवली अर्थसहाय्य.
- **शिर्डी, रत्नागिरी, अमरावती व कोल्हापूर विमानतळाच्या** कामांसाठी तरतूद **गडचिरोलीला नवीन विमानतळ.**

पंचसूत्रीमधील पाचवे सूत्र : उद्योग

- **मॅग्नेटिक महाराष्ट्र** २.० अंतर्गत ९८ गुंतवणूक करारातून १ लाख ८९ हजार कोटी रुपये गुंतवणूक आणि रोजगाराच्या ३ लाख ३० हजार नवीन संधी.
- **ई-वाहन धोरणांतर्गत** सन २०२५ पर्यंत वाहन नोंदणीत इलेक्ट्रीक वाहनांचा हिस्सा १० टक्के व मोठ्या शहरांच्या सार्वजनिक वाहतुकीतील हिस्सा २५ टक्के करण्याचे उद्दिष्ट. ५००० चार्जिंग सुविधा उभारणार.
- **मुख्यमंत्री रोजगार निर्मिती** कार्यक्रमांतर्गत ३०,००० हून अधिक स्वयंरोजगार प्रकल्पातून सुमारे १ लाख रोजगार संधी.
- कोविडमुळे विधवा झालेल्या महिलांना स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी १०० टक्के व्याज परताव्याची **पंडिता रमाबाई स्मृती शताब्दी** महिला उद्योजक ही नवीन योजना.
- मौजे कौडगाव व मौजे शिंदाळा (जि. लातूर), मौजे साक्री (जि. धुळे), वाशीम, मौजे कचराळा (जि. चंद्रपूर) आणि यवतमाळ येथे एकूण ५७७ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प, **राज्यात २५०० मेगावॅट क्षमतेचे नवीन सौर ऊर्जा पार्क.**
- मुंबईत पारेषण प्रणालीच्या क्षमतेत वाढ करण्यासाठी ११,५३० कोटी रुपयाचे ५ प्रकल्प.
- **'भारतरत्न लता दिनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय व संग्रहालय'** स्थापित करण्यासाठी १०० कोटी रुपये निधी राखीव.
- **स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज** यांच्या स्मृतिदिनानिमीत्त वढु बुद्रुक व तुळापूर, ता. हवेली, जि.पुणे या परिसरात स्मारकासाठी २५० कोटी रुपये निधी उपलब्ध करणार.
- 'छत्रपती संभाजी महाराज **शौर्य पुरस्कार** योजना' सुरु करणार.
- स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त महापुरुषांशी संबंधित गावांतील **१० शाळांकरिता १० कोटी रुपये निधी.**
- मुंबई, पुणे व नागपूर येथे स्वातंत्र्यलढ्याशी निगडीत स्थळांचा **'हेरिटेज वॉक'**.
- **रायगड किल्ला व परिसर विकासा**करिता १०० कोटी, राजगड, तोरणा, शिवनेरी, सुधागड, विजयदुर्ग आणि सिंधुदुर्ग या सहा किल्ल्यांसाठी १४ कोटी, मुंबईतील शिवडी व सेंट जॉर्ज किल्ल्यांच्या जतन व संवर्धन आराखड्यांसाठी ७ कोटी प्रस्तावित.
- छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले आणि त्यांच्या गनिमी कावा युद्ध पद्धतीला **जागतिक वारसा** म्हणून घोषित करण्यासाठी युनेस्कोकडे सविस्तर प्रस्ताव दाखल करणार.

- **'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव'** या उपक्रमांतर्गत ५०० कोटीची तरतूद, स्वातंत्र्य सैनिकांना निवासी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी मासिक उत्पन्नाची १० हजार रुपयांची मर्यादा ३० हजार रुपये.
- औरंगाबाद येथील अमृतमहोत्सवी **वंदे मातरम् सभागृहां**करिता ४३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार.
- **अष्टविनायक विकास** आराखड्याकरिता ५० कोटी रुपये.
- **पंढरपूर देवस्थान** मंदिर विकासासाठी ७३ कोटी ८० लाख रुपये रकमेचा आराखडा
- **मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी** वर्ष कार्यक्रमासाठी ७५ कोटी रुपये.

स्मारक

- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मारक उभारणार, महाराणी सईबाई स्मृतीस्थान विकास आणि श्री संत जगनाडे महाराज स्मारकांसाठी निधी उपलब्ध करुन देणार.
- **पंतप्रधान आवास योजना** - ग्रामीण भागातील ५ लाख घरकुल बांधकामाकरिता ६००० कोटी रुपये उपलब्ध करुन देणार.
- **मुंबईबाहेरील झोपडपट्टयांमधील सुधारणां**ची मुलभूत कामे करण्यासाठी १०० कोटी रुपये उपलब्ध करुन देणार.

पर्यटन

- कोयना,जायकवाडी व गोसीखुर्द येथे **जल पर्यटन** प्रकल्प प्रस्तावित.
- जव्हार जि. पालघर, फर्दापूर जि. औरंगाबाद, अजिंठा, वेरूळ, महाबळेश्वर व लोणावळा येथे पर्यटन विकासाकरिता सुविधा निर्माण करण्यासाठी अनुदान.
- पुरातत्व स्मारकांच्या जतन, संवर्धन आणि दुरुस्तीसाठी जिल्हानिहाय **'महावारसा सोसायटीची'** स्थापना.
- बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानात **'आफ्रिकन सफारी'** सुरु करणार.
- पुणे वन विभागात **बिबट्या सफारी** सुरु करणार.

महामंडळे

- **बार्टी, सारथी, महाज्योती** या संस्थाना विविध विकास योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येकी **२५० कोटी** रुपये.
- स्थानिक स्वराज्य संस्थांमधील इतर मागासवर्गीय समाजाचे प्रतिनिधीत्व निश्चित करण्यासाठी **नवीन समर्पित मागासवर्गीय आयोगाची** स्थापना.

- **मौलाना आझाद** आर्थिक विकास महामंडळाची भागभांडवल मर्यादा ५०० कोटी रुपयांवरुन वाढवून **७०० कोटी** रुपये.

वार्षिक योजना :

- सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत १३,३४० कोटी रुपयांची तरतूद.
- वार्षिक योजना १,५०,००० कोटी, अनुसूचित जाती घटक योजना १२,२३० कोटी रुपये, आदिवासी उप योजना ११,१९९ कोटी रुपये.
- अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२२-२३ :— महसुली जमा ४,०३,४२७ कोटी रुपये, महसुली खर्च ४,२७,७८० कोटी रुपये, महसुली तूट २४,३५३ कोटी रुपये.

* * * * *